**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- ५**

**स भा वृ त्तां त**

**दिनांक ०७-७-२०१६** **वेळ-सकाळी ११.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यामा. "क" प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दि.७/०७/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.शितोळे शैलजा बाबुराव **सभापती**
२) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
३) मा.पालांडे सुजाता सुनिल
४) मा.कदम सदगुरु महादेव
५) मा.गिता सुशिल मंचरकर
६) मा.कैलास महादेव कदम
७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
८) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९) मा.गायकवाड संध्या सुरदास
१०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११) मा.शेंडगे आशा सुखदेव
१२) मा.सतिश सदाशिव काटे स्विकृत सदस्य

याशिवाय मा.दिलीप गावडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, प्रशांत पाटील-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.जयंत बरशेट्टी-कार्यकारी अभियंता पापु, मा.पोरेड्डी-उपअभियंता, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्था.,मा.शिंदे-उपअभियंता, मा.वायकर- उपअभियंता, मा.दिलीप धुमाळ- उपअभियंता विदयुत,मा.सोनवणे-उपअभियंता विदयुत,श्री.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख- कनिष्ठ अभियंता पापु, श्रीमती वंदना- क.अभियंता, श्री.रमेश भोसले,श्री.बेद - मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-------

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) सांगवी प्रभाग क्र.५९ मधील आरक्षण क्र.३१९ बाबत-मा.अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) नांव देणेबाबत- मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) उदयानास नांव देणेबाबत- मा.सुजाता पालांडे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) प्रभाग क्र. ४१ मधील रस्त्यांना नांव देण्याबाबत- मा.कैलास कदम, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) प्रभाग क्र.४० खराळवाडी मधील पुलास व प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यवरांची नांवे देण्याबाबत- मा.कैलास कदम, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

-------

दिनांक १/६/२०१६ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १८२ विषय क्रमांक- १

दिनांक-७/७/२०१६ विभाग-

सुचक- मा. अतुल शितोळे अनुमोदक-मा.सदगुरु कदम

संदर्भ- मा. अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

सांगवी प्रभाग क्र. ५९ मधील सर्व्हे नं.१२ उदयान उदयान आरक्षण क्र.३१९ "उदयान" मनपाचे ताब्यात घेणेत येत आहे. तरी सांगवी परिसरातील

१. संत गोरा कुंभार, सातपुडा सोसायटी

२.शिवसृष्टी उदयान,जयमाला नगर

३.छत्रपती शिवाजी उदयान,मधुबन सोसायटी

४. संत सावतामाळी उदयान,PWD कॉलनी परिसर

५.वेताळ महाराज उदयान,सांगवी गावठाण हे

सांगवी विकसीत झाले असून ही तुर्त नवीन उदयानाची गरज नसून आरक्षण क्र.३१९ जागेचा वापर क्रीडांगणा करता करावे अशी MRTP कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी व तेथे त्याकरिता आवश्यक सुविधा मनपा मार्फत करण्यात याव्यात. यांस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक- १८३ विषय क्रमांक- २

दिनांक-७/७/२०१६ विभाग-

सुचक- मा. अतुल शितोळे अनुमोदक-मा.सदगुरु कदम

संदर्भ- मा. अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ५९ मधील सर्व्हे नं.९ मधील सर्व्हे नं.९ आरक्षण क्र. ३४१ येथे नव्याने बांधण्यात येणा-या १५ लाख लिटर क्षमता असलेल्या टाकीचे **"कै.कृष्णाबाई ओंकार ढोरे जलकुंभ"** देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १८४ विषय क्रमांक- ३

दिनांक-७/७/२०१६ विभाग-

सुचक- मा. सुजाता पालांडे अनुमोदक-मा.शैलजा शितोळे

संदर्भ- मा. सुजाता पालांडे, मा. शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३९ मधील महेशनगर मधील पीसीएमटी डेपो मधील उदयानास **"भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम चिल्ड्रन्स पार्क"** हे नांव देण्यात यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १८५ विषय क्रमांक- ४

दिनांक- ७/७/२०१६ विभाग-

सुचक- मा. कैलास कदम अनुमोदक-मा.सदगुरु कदम

संदर्भ- मा. कैलास कदम, मा. सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४१ मधील खालील रस्त्यांना

१) डाल्को कंपनीकडे जाणारा भूयारी मार्गाचा रस्ता यांस ( क क्षेत्रीय कार्यालय) **"कै.मामासाहेब पिंपळे मार्ग"**

२) रॉक्सी हॉटेल रस्ता व देवानी लॉज रस्ता यांस **"श्री महावीर जैन मंदिर मार्ग"** याप्रमाणे नांव देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १८६ विषय क्रमांक- ५

दिनांक-७/७/२०१६ विभाग-

सुचक- मा. कैलास कदम अनुमोदक-मा.सदगुरु कदम

संदर्भ- मा. कैलास कदम, मा. सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४० खराळवाडीमधील पुलास व प्राथमिक आरोग्य केंद्रास खाली नमूद केलेल्या मान्यवरांची नांवे देण्यात यावीत.

१) वल्लभनगर एस.टी.स्टँड समोरील मुंबई-पुणे महामार्गावरील पादचारी पुलास -**"शिक्षण महर्षी डॉ.पी.डी.पाटील पादचारी मार्ग"**

२) वल्लभनगर एस.टी.स्टँड समोरील मुंबई-पुणे रोड भूयारी मार्गास **"मा.सौ.भाग्यश्रीताई पी.डी.पाटील भूयारी मार्ग"**

३) मुंबई- पुणे रोड एच.ए.कॉलनी येथील भूयारीमार्गास **"कै.संदिप वसंतराव शेवडे भूयारी मार्ग"**

४) खराळवाडीतील पिंपरी चिंचवड प्राथमिक आरोग्य केंद्रास **"कै.बापु तुकाराम सुतार प्राथमिक आरोग्य केंद्र"** याप्रमाणे नांवे देण्यात यावीत. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.सदगुरु कदम मा.अतुल शितोळे

जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीच्या निर्मितीपासून एच.ए.कॉलनी जवळ एक विसावा आहे. सदर विसाव्याचे ठिकाणाचे नियोजन मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांनी अत्यंत चांगल्याप्रकारे केलेले असलेने आरोग्य विभाग,स्थापत्य विभाग,उदयान विभाग तसेच त्यांच्या सर्व टिमचे अभिनंदन करणेत यावे.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

**मा.सभापती-** जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीच्या निर्मितीपासून एच.ए.कॉलनी जवळ एक विसावा आहे. सदर विसाव्याचे ठिकाणाचे नियोजन मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांनी अत्यंत चांगल्याप्रकारे केलेले असलेने आरोग्य विभाग,स्थापत्य विभाग,उदयान विभाग तसेच त्यांच्या सर्व टिमचे अभिनंदन करणेत येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/

**(मा.शितोळे शैलजा बाबुराव)**

सभापती

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/८२/२०१६.



दिनांक- १३/०७/२०१६

प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.